# पुरवठादारांसाठी आचारसंहिता

# वेदाताच्या पुरवठादारासाठी

पुरवठादारांसाठीची ही आचारसंहिता जगभरातील "पुरवठादरांना" लागू आहे. इथे "पुरवठादार" म्हणजे पुरवठादार/सेवा प्रदाते/व्यापारी/एजंट्स/सल्लागार/कंत्राटदार/संयुक्त उपक्रम भागीदार/तृतीय पक्ष ज्यामध्ये त्यांचे कर्मचारी, एजंट्स आणि इतर प्रतिनिधी समाविष्ट आहेत ज्यांचा वेदांता रिसोर्सेस पीएलसी किंवा त्याच्या उपकंपन्या, संलग्न कंपन्या, विभाग ("वेदांता") यांच्याशी व्यावसायिक संबंध आहे आणि यांना कोणत्याही प्रकारच्या वस्तू किंवा सेवा पुरवतात, विक्री करतात किंवा विक्री करू इच्छितात.

ही संहिता म्हणजे मूलभूत आवश्यकता आहेत ज्यांचा वेदांतासोबत व्यवसाय करताना आम्ही आमच्या पुरवठादारांना आदर करण्यास आणि पालन करण्यास सांगत असतो. ही संहिता आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त मानकांप्रती वेदांताची बांधिलकी दर्शवते, ज्यात आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची मुख्य अधिवेशने, संयुक्त राष्ट्रांची मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा तसेच प्रचलित उद्योग मानके आणि पर्यावरण संरक्षण, किमान वेतन, बालकामगार, लाचलुचपत प्रतिबंधक, भ्रष्टाचारविरोधी, आरोग्य आणि सुरक्षितता, टिकावूपणा, याबाबत सर्व संबंधित आणि लागू वैधानिक आवश्यकता तसेच जे कोणतीही आवश्यकता आचाराची सर्वोच्च मानके मांडतात त्यांचा समावेश आहे.

**<u>श्रम (कामगार) आणि मानवी हक्क</u>**

सर्व कामगार कायदे आणि मानवी हक्क कायद्यांचे पालन करुन पुरवठादार पुढील करतील:

- मानवी हक्कांसंबंधी सर्व लागू स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय कायद्यांचे पालन करतील.
- कंपनीच्या मानवी हक्क धोरणाचे आणि पुरवठादार शश्वत व्यवस्थापन धोरणाचे पालन करतील.
- त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वेच्छेने कामावर घेतले आहे याची सुनिश्चिती करतील आणि त्यांची सर्व कामे बळजबरी, वेठबिगारी, सक्ती, करारबद्धता, तुरुंगातील मजुरी किंवा इतर कोणत्याही सक्तीच्या मजुरीपासून आणि बालमजुरीपासून मुक्त असल्याची हमी देतील.
- त्यांच्या सगळ्या कर्मचाऱ्यांना रोजगाराच्या समान संधी उपलब्ध असल्याची, त्यांच्या वाढीस पोषक, कोणत्याही प्रकारचा भेदभाव आणि छळ यापासून मुक्त वातावरण उपलब्ध असल्याची सुनिश्चिती करतील.
- त्यांच्या कामगारांच्या संघटना आणि सामूहिक सौदेबाजीच्या स्वातंत्र्याच्या अधिकाराचा आदर करतील.
- कामाचे तास, किमान वेतन, लाभ, ओव्हरटाइम, सुट्या इ.बाबत लागू कायदे व नियमांचे पालन करण्याची सुनिश्चिती करतील.
- गुलामगिरी आणि मानवी तस्करीबाबत असलेल्या सर्व कायद्यांचे पालन करतील- आधुनिक गुलामगिरी कायदा. आपले व्यवसाय कार्य, अंतर्गत आणि पुरवठा श्रृंखला या दोन्हीत आणि इतर बाह्य व्यवसाय संबंधांमध्ये गुलामगिरी मानवी तस्करी प्रघातांपासून मुक्त असल्याची सुनिश्चिती पुरवठादार करतील.
- कर्मचाऱ्यांकडून भरतीसाठी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही शुल्क किंवा किंमत आकारली जाणार नाही याची सुनिश्चिती करतील.
- कामगाराचे ओळख दस्तऐवज किंवा व्यवसाय / काम परवाना यासह कोणत्याही मौल्यवान वस्तू आणि आपल्या कोणत्याही कामगार/कर्मचाऱ्याचे प्रवास दस्तऐवज जप्त किंवा रोखून ठेवणार नाही.

Sensitivity: Internal (C3)

**आरोग्य, सुरक्षितता व पर्यावरण शाश्वतता**

- पुरवठादार आपल्या कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी सुरक्षित व निरोगी वातावरण प्रदान करेल आणि काम करण्याच्या परिस्थितीसंबंधी लागू असलेल्या सर्व कायद्यांचे व नियमांचे पालन करेल.
- पुरवठादारांनी आपली व्यावसायिक कामे जबाबदारीने आणि वेदांताच्या शाश्वतता आराखड्याचा (व्हीएसएफ) भाग म्हणून वेदांताच्या आरोग्य, सुरक्षितता, पर्यावरण व शाश्वतता मानकांचे पालन करुन करणे अपेक्षित आहे.
- कंपनीसाठी कोणतेही काम करताना पुरवठादाराने पर्यावरणाची शाश्वतता व संरक्षणावरील सगळ्या कायद्यांसह देशातील सगळ्या कायद्यांचे पालन करावे. हरित वायू उत्सर्जन, ऊर्जा वापर, प्रदूषण प्रतिबंध, कचरा व्यवस्थापन, संसाधन कार्यक्षमता आणि जैवविविधतेवरील प्रभाव कमी करणे यासारख्या पैलूंच्या व्यवस्थापनाचा पर्यावरणाप्रतीच्या जबाबदारीत समावेश आहे.
- पुरवठादारांनी आपल्या पुरवठा शृंखलेत आणि कामात शाश्वत पद्धतींचा स्वीकार करावा.

**व्यवसायनिष्ठा**

**लाचखोरी विरोधी:** पुरवठादार, थेट किंवा मध्यस्थांद्वारे कोणत्याही अनैतिक वर्तनाचा (अव्यक्त किंवा स्पष्ट) कोणताही आधार घेणार नाही किंवा तृतीज पक्षाकडून, खाजगी किंवा सार्वजनिक, कोणत्याही वेदांता कर्मचाऱ्यासह व्यवसाय किंवा इतर फायदे मिळवण्यासाठी किंवा टिकवून ठेवण्यासाठी कोणताही वैयक्तिक किंवा अयोग्य फायदा देऊ करणार नाही किंवा वचन देणार नाही. विशेषतः:

- लाच देऊ करणार नाही किंवा स्वीकारणार नाही किंवा अनुचित किंवा अयोग्य फायदा घेण्याचा इतर मार्ग वापरणार नाही, संगनमताने आर्थिक लाभ देणार किंवा स्वीकारणार नाही आणि फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट ऑफ युएसए (एफसीपीए), ब्रायबरी ॲक्ट ऑफ युनायटेड किंगडम आणि भारतातील भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यासह लागू लाचखोर विरोधी कायदे आणि नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कृती करणार नाही किंवा आपल्या व्यवसाय भागीदाराला यांचे उल्लंघन करण्यास भाग पाडणार नाही.

- कोणत्याही कौटुंबिक/सामाजिक/राजकीय संबंधांचा अनुकूल वागणूक मिळण्यासाठी किंवा व्यवसायाच्या प्रगतीसाठी किंवा मर्जी प्राप्त करण्यासाठी फायदा घेणार नाही. वेदांताशी संबंधासाठी योग्यता / गुणवत्ता हा एकमेव गुण असेल.

- वेदांताच्या हितात प्रत्यक्ष किंवा संभाव्य संघर्ष निर्माण होईल अशाप्रकारे वेदांताच्या कर्मचाऱ्याशी आर्थिक किंवा इतर कोणताही संबंध स्थापित करणार नाही. वेदांतासोबत करारबद्ध असलेल्या कर्मचाऱ्याला किंवा व्यावसायिकाला पुरवठादाराच्या व्यवसायात कोणत्याही प्रकारे रुचि असेल किंवा पुरवठादाराशी आर्थिक संबंध स्थापित करण्यास रस असेल अशा परिस्थितीत पुरवठादाराने वेदांताला सूचित करणे अपेक्षित आहे.

- कोणताही लाभ किंवा अनुचित मर्जी प्राप्त करण्याच्या उद्देशाने कोणतीही भेटवस्तू, आदरातिथ्य किंवा मनोरंजन देऊ करणार नाही.

- कंपनीच्या परवानागीशिवाय कंपनीच्या कर्मचाऱ्याला नियुक्त करणार नाही.

**अनुचित व्यापार पद्धती:** कोणत्याही अनुचित किंवा स्पर्धाविरोधी व्यापार पद्धतींपासून पुरवठादार दूर राहील.

**अनैतिक पद्धती आणि तक्रारनिवारण यंत्रणांचा अहवाल देणे**

कोणताही कामगार/कर्मचारी, वैयक्तिकरीत्या किंवा इतर कामगारांसोबत वागणारा, कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह किंवा बदला न घेता तक्रार दाखल करू शकतो याची खात्री करण्यासाठी पुरवठादाराने एक प्रभावी तक्रार प्रक्रिया स्थापित केली आहे याची खात्री करावी.

https://www.vedantalimited.com/uploads/corporate-governance/policies_practices/Code-of-Business-Conduct-and-Ethics-Eng.pdf
कंपनीच्या या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या वेदांता व्हिसल ब्लोअर धोरणानुसार वेदांताच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने/इतर पुरवठादाराने कोणत्याही अनैतिक कृतीचा किंवा भेदभावाचा अवलंब केल्यास पुरवठादार त्वरित तक्रार करेल.

**बौद्धिक संपदा**

वेदांताची गोपनीय आणि मालकीची माहिती/बौद्धिक संपदा/तंत्रज्ञान, वेदांताशी व्यावसायिक संबंध/व्यवहारादरम्यान पुरवठादाराच्या माहितीत आल्यास तो ते सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्याचे उल्लंघन न करण्यासाठी योग्य ती पावले उचलेल. उप-कराराच्याबाबतीत वेदांताच्या संमतीनेच गोपनीय माहिती सामायिक करावी.

**तृतीय पक्ष प्रतिनिधीत्व**

वेदांताच्या लेखी परवानगीशिवाय वेदांताचे प्रतिनिधीत्व करण्यास किंवा वेदांताचे ब्रँड वापरण्यास पुरवठादार अधिकृत नाहीत. वेदांताचे प्रतिनिधीत्व करण्यास अधिकृत असलेले तृतीय पक्ष आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेदांताच्या आचारसंहितेचे पालन करणे व व्यवसाय नीती धोरणाचे आपल्या संवादात आणि वेदांताच्यावतीने त्यांच्याशी सामायिक केलेल्या माहितीच्या गोपनीयतेसह आणि माहितीच्या गोपनीयतेच्या पालनासाठी नॉन-डिस्क्लोजर करारावर स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

**आतील व्यक्तीद्वारे गैरव्यवहारावर प्रतिबंध**

पुरवठादाराला जर वेदांता किंवा त्याच्या व्यवसायाशी संबंधित सामग्री, गैर-सार्वजनिक माहिती ज्ञात झाली तर तो वेदांताच्या सिक्युरिटीजची खरेदी किंवा विक्री करू शकत नाही किंवा त्या माहितीचा लाभ घेण्यासाठी ती माहिती इतरांना देण्यासह इतर कोणतीही कृती करू शकत नाही. याशिवाय, पुरवठादाराला जर वेदांताचे ग्राहक, पुरवठादार, विक्रेते किंवा इतर व्यवसाय भागीदार यासह इतर कोणत्याही कंपनीची माहिती वेदांताशी पुरवठादाराच्या संवादादरम्यान कळली तर पुरवठादार त्या कंपनीच्या सिक्युरिटीजची खरेदी किंवा विक्री करू शकत नाही किंवा त्या माहितीचा लाभ घेण्यासाठी ती माहिती इतरांना देण्यासह इतर कोणतीही कृती करू शकत नाही.

**पुरवठादाराची अनुपालन बांधिलकी**

ही संहिता स्वीकारली आहे आणि आपल्या पुरवठा श्रृंखलेत प्रत्येक स्तरापर्यंत पोहचली आहे याची सुनिश्चिती पुरवठादाराने करावी. पुरवठादाराने आपले एजंट्स, कंत्राटदार आणि पुरवठादारांना या संहितेची माहिती असल्याची, तिच्या परिणामांची आणि ती स्वीकारली असल्याची सुनिश्चिती करावी. पुरवठादाराने आपल्या स्वतःच्या पुरवठादारांसाठी टिकाऊ खरेदी पद्धती असल्याची सुनिश्चिती करावी.

पुरवठादाराने लागू असलेल्या सर्व कायदे आणि नियमांचे आणि विशेषतः या संहितेचे शब्दशः व सर्वार्थाने पालन करावे अशी वेदांताची अपेक्षा आहे. या संहितेतील मजकूर आणि वेदांताची आचारसंहिता व व्यवसाय नीतीमत्ता धोरण वाचणे व समजून घेणे ही पुरवठादाराची जबाबदारी आहे. वेदांतासोबत व्यवसाय करण्याची अट म्हणून पुरवठादाराने ही संहितेच पालन करावे आणि वेदांताशी व्यवसाय संबंध असताना अशा मूल्यांना उचलून धरण्यास मान्यता द्यावी.

या आचारसंहितेचा स्वीकार केल्याने पुरवठादार त्यांच्या पुरवठादारांसोबत 'संहिता' पालन सुनिश्चित करतील असा अर्थ होतो.

या संहितेतील तत्त्वांचे पालन करत असल्याचे दर्शवण्यासाठी पुरवठादार पुरेसे दस्तऐवज राखून ठेवेल आणि वाजवी सूचना दिल्यानंतर वेदांताला अनुपालन तपासू देईल.

वेदांतासोबतच्या व्यवहाराशी संबंधित पुरवठादाराच्या कोणत्याही ज्ञात किंवा संशयित अयोग्य वर्तनाबद्दल किंवा वेदांता कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही ज्ञात किंवा संशयित अयोग्य वर्तनाबद्दल पुरवठादारा वेदांतला सूचित करेल.

**जबाबदारी व पुनर्विलोकन**

या संहितेसाठी देखरेख व्यावसायिक व्यवस्थापन समितीद्वारे प्रदान केली जाईल. या संहितेच्या अंमलबजावणीसाठी ग्रुप हेड – कमर्शियल व बिझनेस मुख्य कमर्शियल अधिकारी जबाबदार असतील. संहितेचे वार्षिक पुनर्विलोकन केले जाईल.

या संहितेबाबत काही प्रश्न असल्यास कृपया संबंधित प्रमुख - कमर्शियल/कंपनी सेक्रेटरी यांच्याशी संपर्क साधावा.

ऑगस्ट-2023